महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.
(राज्यातील सर्व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राचे भौगोलिक माहिती प्रणाली वापरुन (Geographical Information System-GIS) GIS Mapping करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन पूरकपत्र क्र. टिपीएस-१८२२/१३११/प्र.क्र.१३९/२०२२/नवि-१३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७.१०.२०२३.

## पूरकपत्र

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**प्रस्तावना -** राज्य शासनाने निर्णय क्र.टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि.२५.०१.२०१९ अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरणे, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या क्षेत्रासाठीच्या विकास योजना ह्या GIS प्रणाली वापरुन द्रुतगती पध्दतीने तयार करणेबाबत *महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६* चे कलम १५४ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे) अन्वये निदेश राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना दिले आहेत.

त्याच धर्तीवर राज्यातील सर्व पर्यावरणदृष्ट्या संवदेनशील क्षेत्रांचे (Eco-Sensetive Zones) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्रे" असा केला आहे) मॅपिंग करण्याच्या दृष्टीने उक्त क्षेत्रांचे, भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System-GIS) वापरुन सर्वेक्षण (GIS Mapping) करण्यासाठी उक्त अधिनियमाचे **कलम १५४** अन्वये प्राप्त अधिकारात राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये यांना शासनाने निर्णय क्र.टिपीएस-१८२२/१३११/प्र.क्र.१३९/२०२२/नवि-१३, दि.२९.११.२०२२ अन्वये निदेश दिले आहेत.

**सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे पूरकपत्र निर्गमित करण्यात येत आहे.**

I. उक्त GIS Mapping ची कामे पूर्ण करण्याकरिता खालील नमूद लेखाशीर्षातील तरतुदीतून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निदेशातील **अनुक्रमांक ६** खालीलप्रमाणे वाचावे.

| दि.२९.११.२०२२ या शासन निर्णयामधील तरतुद | याऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|
| तरतुद - तांत्रिक बाबी अ.क्र.(६) | ६. उक्त क्षेत्राचे GIS Mapping करण्याकामी संगणकी करणासाठी व इतर संनियंत्रण व देखभालीसाठी येणारा खर्च हा संगणकीकरणाकामी केंद्र शासना च्या ‘Scheme for Special Assistance to States for Capital Investment’ या योजनेमधून नगर रचना संचालनालयास प्राप्त होणाऱ्या निधीमधून भागविण्यात यावा. | ६. उक्त क्षेत्राचे GIS Mapping करण्याकामी संगणकीकरणासाठी व इतर संनियंत्रण व देखभालीसाठी येणारा खर्च हा प्रादेशिक योजना तयार करणे (अनिवार्य) लेखाशिर्ष (२२१७०१६३) या लेखाशिर्षाखाली प्राप्त होणाऱ्या निधीमधून भागविण्यात यावा. |

**II. सदर योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी खर्च करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत असून जिल्हाधिकारी यांची जवाबदारी खालीलप्रमाणे राहील.**

१. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांची कार्यान्वयन यंत्रणा "जिल्हाधिकारी कार्यालय" राहिल. सदर निधीचा विनियोग संबंधित जिल्हाधिकारी यांनी उक्त योजनेअंतर्गत शासनाने नेमून दिलेल्या उद्दिष्टांसाठी करावा. या अंतर्गत काम शासन निर्णय / संनियंत्रण समिती यांनी निश्चित केलेल्या निकषांनुसार असल्याबाबत तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे, हे पाहण्याची जबाबदारी संनियंत्रण समितीच्या मान्यतेने संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

२. सदर निधी खर्च करताना तो विहीत कार्यपद्धती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. तसेच निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय मर्यादेचा भंग होणर नाही तसेच, कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा (Finance Power) भंग होणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

३. प्रस्तूत योजनेंतर्गत मंजूर निधीचे वितरण जिल्हाधिकारी यांनी आवश्यकतेनुसार करावे.

४. या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावी.

या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता संबंधित जिल्हाधिकारी, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१२०५१४५०३७६१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

PRANAV BABANRAO KARPE

Digitally signed by PRANAV BABANRAO KARPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=a1dd0320336e8efbf6fec4f20e36188c5c1e2bc06d80c952f9de780e2353db93, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E64D615F4F8FB519BB2C2EA02E76491C2345A4C4D7396C64E229AA3F18E31CF2, cn=PRANAV BABANRAO KARPE
Date: 2023.12.05 14:57:27 +05'30'

**( प्रणव कर्पे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
**जिल्हाधिकारी - सर्व जिल्हे** यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**प्रत -**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी -**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय सहसंचालक, नगर रचना, पुणे / नागपूर / अमरावती / कोकण / औरंगाबाद / नाशिक.

३) विभागीय आयुक्त, पुणे / नागपूर / अमरावती / कोकण / औरंगाबाद / नाशिक.

४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

५) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

७) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

९) उप सचिव, (कार्यासन क्र.नवि-२७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) अवर सचिव, नवि -११ / नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि -१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

१२) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- सदर पूरकपत्र विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

१३) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- सदर पूरकपत्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१४) निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).